# उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे

(डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली)

ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग ४१६ ५२०

दूरध्वनी क्र- ०२३६२-२९९२७५, २९९२७३ इ-मेल – cohmulde@gmail.com


जा.क्र. उविममु/वाहन/1407/२०२५ दिनांक : ०७/०७/२०२५

## जाहीरात

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने कालावधीकरीता खाली दिलेल्या तपशिलाप्रमाणे ट्रॅक्टर चालक या रिक्त पदांकरीता तात्पूरत्या स्वरुपात अकरामाही तत्वावर व ठोक वेतनावर अर्हता प्राप्त उमेदवारांकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांनी आपले अर्ज दिनांक २१/०७/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मा. सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग या कार्यालयात सादर करावयाचे आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | पदाची संख्या | एकत्रित ठोक वेतन प्रति महिना (रू.) | नेमणूकीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | ट्रॅक्टर चालक | ०१ | १६,०००/– | ११ महिने |

पदासाठी पात्रता:

१. इयत्ता १० वी पास, ट्रॅक्टर व तत्सम जड वाहन चालवण्याचा सक्षम प्राधिकाऱ्यांचा परवाना दिलेल्या परवान्यासह २ वर्षाचा जड वाहन चालविण्याचा अनुभव किंवा

२. या विद्यापीठात सेवेत ट्रॅक्टर चालक म्हणून तात्पुरता/रोजंदारी स्वरूपात काम करीत असलेल्या साठी १० वर्षे किंवा त्याहून जास्त अनुभव, तसेच ट्रॅक्टर चालविण्याचा सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला परवाना.

३. या कार्यालयातंर्गत ट्रॅक्टर चालकाचे काम केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

**नियम व अटी:**

१. उपरोक्त पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांसाठी वयोमर्यादा ही १८ ते ५८ वर्षे अशी राहील.

२. अर्जाच्या लखोटयावर ट्रॅक्टर चालक पदासाठी अर्ज असा उल्लेख असावा.

३. पात्र उमेदवाराच्या निवड समितीद्वारे मुलाखत तसेच प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येतील.

४. मुलाखतीला येताना अर्जाला जोडण्यात आलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ प्रति सादर करणे आवश्यक आहे.

५. मुलाखतीला बोलविण्यात आलेल्या उमेदवारांना प्रवास तसेच दैनंदिन भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

६. निवड झालेल्या उमेदवाराला नेमणूकीच्या आदेशातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा विहीत नमुन्यात रू. ५००/– रक्कमेच्या बॉड पेपरवर लिहून द्यावा लागेल.

७. निवड झालेल्या उमेदवाराला अकरा महिने किंवा प्रकल्पाच्या कालावधी नुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल.

८. नियुक्त केलेल्या उमेदवाराच्या कामाचे निवड समितीमार्फत मुल्य मापन करण्यात येईल. सदर उमेदवाराचे काम असमाधानकारक आढळल्यास करण्यात आलेली नियुक्ती दिलेल्या कालावधीच्या आधी समाप्त करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील.

९. अर्जासोबत जोडण्यात आलेल्या छायांकीत प्रति साक्षांकीत/समक्ष साक्षांकीत केलेल्या असाव्यात. स्वयं साक्षांकन केल्यास स्वयंघोषणापत्र जोडणे अनिवार्य आहे.(सोबत स्वयंघोषणापत्राचा नमुना जोडण्यात आला आहे.) उमेदवाराला नोकरी साडावयाची असल्यास त्याने तसे एक महिना आधी लेखी कळविण्यात यावे तसे न केल्यास त्याचा एक महिन्याचा पगार कापून घेण्यात येईल.

१०. निम्न स्वाक्षरीकार यांना प्राप्त अर्ज/सर्व अर्ज कोणतेही कारण न दाखविता नाकरण्याचे हक्क आहेत.

११. उमेदवाराला देण्यात आलेली तात्पुरत्या स्वरूपातील नियुक्ती त्याचे वेतन विहीत मुदतसंपल्यानंतर आपोआपच रद्द होतील.

१२. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना अ मध्ये अर्जासोबत सादर करावे.

१३. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एसएलपी—५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या नियुक्तीवरील उमेदवारास विद्यापीठ सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.

१४. उमेदवारावाचे काम समाधानकारक न आढळल्यास अथवा गैरवर्तणूक आढळल्यास तात्पुरत्या स्वरुपातील नेमणूकीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणतेही कारण न देता प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्याचा अधिकार कार्यालयास राहील.

१५. कोणतेही टपाल विलंबनासाठी विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१६. कोणत्याही स्वरुपात राजकारणात सहभाग आढळून आल्यास उमेदवाराला या पदासाठी अपात्र ठरविले जाईल.

१७. वयाचा लाभ/फायदा घेणाऱ्या उमेदवाराने नॉनक्रिमिलेअर/जातीचा दाखला जोडणे आवश्यक आहे

१८. नावामध्ये बदल असल्यास राजपत्र (गॅजेट) जोडण्यात यावे.

१९. निम्नस्वाक्षरीकारांना प्राप्त अर्ज कोणतेही कारण न दाखवता नाकारण्याचे पूर्ण हक्क आहेत.

अर्जा सोबत जोडण्यात येणाऱ्या सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रत सत्यप्रत केलेल्या असाव्यात.जर प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती स्वयंसाक्षांकित केल्या असतील तर शासन निर्णय क्रमांक प्रसुधा/१६१४/३४५ /प्र. क्र. ७१/१८—अ, दिनांक ०९/०३/२०१५ अन्वये विहीत नमुन्यातील स्वयंसाक्षांकनाचे स्वयंघोषणापत्र सोबत सादर करणे आवश्यक आहे.

सहयोगी अधिष्ठाता
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

प्रत: प्रभारी अधिकारी, कृ. ज्ञान व व्यवस्थापन कक्ष, डॉ. बा. सा. को. कृषि विद्यापीठ, दापोली

सदरची जाहिरात WWW.dbskkv.org या विद्यापीठ संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात यावी